**दिनांक - २६/०६/२०२४**

## जागतिक अंमली विरोधी दिनानिमित्त अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, बृहन्मुंबई चे वतीने आयोजित विविध जनजागृती कार्यक्रम

संयुक्त राष्ट्राच्या वतीने २६ जून हा दिवस **आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ सेवन आणि अवैध तस्करी विरोधी दिवस** म्हणून पाळला जातो. त्याअनुषंगाने बृहन्मुंबई पोलीस दलातील अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखेचे वतीने अंमली पदार्थामुळे होणारे सामाजिक, आर्थिक, मानसिक दुष्परिणाम याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे वतीने दिनांक १२/०६/२०२४ ते २६/०६/२०२४ रोजी पर्यंत अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा साजरा करण्यात आला.

आज दिनांक २६/०६/२०२४ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वतीने अंमली पदार्थ विरोधात जनजागृती करण्यासाठी माहिम, धारावी, सायन, कुर्ला परिसरात वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीतील वाहनांवर अंमली पदार्थापासून परावृत्त करणारे संदेश असणारे बॅनर्स व स्टिकर्स लावण्यात आले होते. त्यावेळी स्मिता फाऊंडेशनचे कलाकारांनी व पी.सी.जी.टी. एनजीओ चे प्रतिनिधी यांनी अंमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत पथनाटय सादर केले. तसेच स्मिता फाऊंडेशनचे कलाकारांनी दादर रेल्वे स्टेशन व लालबाग चौकी, परेल पश्चिम परिसरात अंमली पदार्थ दुष्परिणामांबाबत पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. वाहन रॅलीचे वेळी १०० ते १५० विद्यार्थी तसेच इतर एन.जी.ओ.चे १०० सदस्य उपस्थित होते.

तसेच अंमली पदार्थ विरोधी पंधरावड्यामध्ये कांदिवली युनिटने विंग्ज फाऊंडेशन व्यसनमुक्ती केंद्र व जीवन नवजीवन फाऊंडेशन व्यसनमुक्ती केंद्र येथे उपचार घेणाऱ्या सेवनार्थीसाठी मार्गदर्शन शिबीराचे आयोजन केले होते. सदर वेळी एकूण २३ उपचारार्थी हे सहभागी झाले होते. आझाद मैदान युनिटद्वारे निरीक्षण गृह, डोंगरी येथील १०० विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले.

अंमली पदार्थ विरोधी जनजागृती करीता मुंबईचे विविध भागांमध्ये एकूण १६ ठिकाणी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले. एकूण १५ शाळा/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अंमली पदार्थाचे दुष्परिणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये एकूण २५५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याव्यतिरिक्त मुंबईतील विविध गर्दीची ठिकाणे, रेल्वे स्टेशन, शाळा/महाविद्यालय परिसरात अंमली पदार्थ विरोधी संदेश असणारे स्टिकर्स लावून व पत्रके वाटून जनजागृती करण्यात आली. अशा प्रकारे अंमली पदार्थ विरोधी कक्षाने विविध कार्याक्रमांचे आयोजन करून एकूण १०२०० मुंबईकरांना अंमली पदार्थापासून दूर राहणेबाबत आवाहन करण्यात आले.

सदर कार्याक्रमाचे आयोजन मा.पोलीस आयुक्त, श्री. विवेक फणसळकर, मा.विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा.अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. शहाजी उमाप (अति.कार्यभार), मा. पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, श्री. शाम घुगे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, अं.प.वि.कक्ष श्री. राजेंद्र शिरतोडे यांचे मार्गदर्शनाखाली तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्षा अंतर्गत आझाद मैदान युनिटचे प्रपोनि श्री. राजेंद्र दहिफळे, वरळी युनिटचे प्रपोनि श्री. संदिप काळे, घाटकोपर युनिट प्रपोनि श्रीमती लता सुतार, बांद्रा युनिटचे प्रपोनि श्री. संजय चव्हाण, कांदिवली युनिटचे प्रपोनि श्री. वैभव धुमाळ, पोनि प्रशासन श्री. किरण लोंढे यांनी आयोजित केले आहे.